आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१२ फेब्रुवारी २०२६ -गुरुवार

**ठळक बातम्या**

- भारत अमेरिका व्यापार कराराबाबत आजही लोकसभेत गदारोळ, विरोधी पक्ष नेता राहुल गांधी यांच्या विरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव

- केंद्रीय अर्थमंत्री राज्यसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देणार

- केंद्र सरकारच्या विविध धोरणं आणि निर्णयांविरोधात कामगार संघटनांनी पुकारलेल्या भारत बंदला संमिश्र प्रतिसाद

- सामूहिक कॉपी प्रकरणात आतापर्यंत ४६ जणांवर कारवाई

- टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना नामिबियाबरोबर दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर संध्याकाळी ७ वाजता

**आणि**

- दूरदर्शनच्या माजी वृत्तनिवेदिका सरला महेश्वरी यांचं निधन

**<><><><><>**

लोकसभेत आज प्रश्नोत्तराचा तास पुकारल्यानंतर सुरू झालेल्या गदारोळामुळे सभागृहाचं कामकाज आधी दुपारी बारा आणि नंतर दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

सभागृहाचं आजचं कामकाज सुरू झाल्यावर पीठासीन अधिकाऱ्यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. त्यानंतर लगेच विरोधी पक्ष सदस्यांनी भारत- अमेरिका व्यापार कराराविरोधात घोषणा देत हा करार आणि चार कामगार कायदे मागे घ्यावेत अशी मागणी केली. या गदारोळातच मंत्री श्रीपाद नाईक यांनी प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्नाला उत्तर देण्याचा प्रयत्न केला. विरोधकांनी हौद्यात उतरून

घोषणाबाजी सुरू केल्यामुळे गदारोळ वाढत गेला.  आणि पीठासीन अधिकाऱ्यांनी कामकाज तहकूब केलं.

त्यानंतर सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यावर केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी सादर केलेल्या औद्योगिक संबंध संहिता विधेयकावर चर्चेला सुरुवात झाली. या चर्चेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, शिवसेनेचे खासदार रवींद्र वायकर, काँग्रेसचे खासदार एम के विष्णु प्रसाद यांनी भाग घेतला.

दरम्यान, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात आपण हक्कभंग नोटीस दिल्याचं भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी वार्ताहरांना सांगितलं. राहुुल गांधी परदेशात जाऊन सोरोस फाऊंडेशन, USAID, फोर्ड फाऊंडेशन अशा संस्थांशी संधान साधत देशविरोधी शक्तींशी हातमिळवणी करतात हे आपण आपल्या नोटीशीत सांगितल्याचं दुबे म्हणाले.

**होल्ड बाईट दुबे**

**<><><><><>**

ओदिशामधल्या एका अंगणवाडी केंद्रामधल्या कथित जातीय भेदभावाचा मुद्दा विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी आज राज्यसभेत शून्य प्रहरात उपस्थित केला. देशात सुधारणा आणि प्रगती होत असल्याचा दावा केला जात असताना सामाजिक भेदभावाचा प्रत्यय अशा घटनांमधून सातत्याने  येत आहे, असं खरगे म्हणाले. ओदिशामधल्या या अंगणवाडीत दलित महिलेने बनवलेलं अन्न आपल्या मुलांना खायला विशिष्ट समुदायातल्या लोकांनी नकार दिल्याचं वृत्त माध्यमांमधे आलं होतं. मुलांच्या शारीरीक आणि बौद्धिक विकासामधे अंगणवाडीची भूमिका महत्त्वाची असते, तिथेच जर अशाप्रकारचा भेदभाव होत असेल तर याचा मुलांच्या वाढीवर दूरगामी परिणाम होईल, अशी भिती खरगे यांनी व्यक्त केली.

**होल्ड बाईट खरगे**

**त्याआधी** खासदार एल मुरुगन यानी सार्वजनिक लेखा आणि सार्वजनिक उपक्रम समितीसाठी सात सदस्यांच्या निवडीचा प्रस्ताव सभागृहात मांडला. हा प्रस्ताव आवाजी मतदानाने मंजूर झाला. अनुसूचित जाती आणि जमाती समितीवर दहा सदस्यांच्या निवडीचा प्रस्तावही सभागृहाने मंजूर केला.

**राज्यसभेत** आज अर्थसंकल्पावरली चर्चा पुढे सुरू झाली.
भारताची अर्थव्यवस्था ही जगातली चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनली आहे, असं भाजपा खासदार मदन राठोर यावेळी म्हणाले. भारत हा मोबाईल फोन निर्मिती करणारा जगातला दुसऱ्या क्रमांकाचा देश बनला असून भारत मोबाईल फोनची निर्यात करत आहे, असं राठोर म्हणाले. भाजपा खासदार शंभु शरण पटेल यांनीही या चर्चेत भाग घेतला.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन या आज अर्थसंकल्पावरल्या चर्चेला राज्यसभेत उत्तर देणार आहेत.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या विविध धोरणं आणि निर्णयांच्या विरोधात प्रमुख १४ कामगार संघटनांनी पुकारलेल्या भारत बंदला आज देशाच्या विविध भागात अंशतः प्रतिसाद मिळाला. नवीन कामगार कायदे, बीज विधेयक, वीज सुधारणा विधेयक तसंच अणुऊर्जा विकास विधेयक मागे घ्यावे, विकसित भारत जी राम जी योजनेऐवजी मनरेगाचं पुनरुज्जीवन करावं या आणि इतर मागण्यांसाठी विविध कामगार संघटनांनी एकत्र येऊन आजचा बंद पुकारला आहे. काँग्रेस, समाजवादी पार्टी आणि आम आदमी पार्टीने बंदला पाठिंबा जाहीर केला आहे.

महाराष्ट्र राज्य वैद्यकीय विक्री प्रतिनिधी संघटनेच्या जळगाव शाखेतर्फे संप पाळण्यात येत असून, कामगारांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शनं करून निवेदन दिलं. या संपाला पाठींबा देत आज धुळे कृषी उत्पन्न बाजार

समितीत कामकाज बंद ठेवत हमाल मापाडी कामगारांनी रास्तारोको आंदोलन केलं. यामुळे बाजार समिती ठप्प होवून शुकशुकाट पसरला आहे.

<><><><><>

धुळे जिल्ह्यात बोरविहिर धुळे ते नरडाणा या नवीन रेल्वे मार्गाच्या कामासाठी जमिनीचा ताबा द्यायला विरोध करत आज शिंदखेडा तालुक्यात माळीच इथे शेतकऱ्यांनी आंदोलन केलं. भूसंपादनाचा योग्य मोबदला मिळत नसल्यानं शेतकऱ्यांकडून विरोध करण्यात येत आहे. प्रशासनाने पोलिसांच्या बंदोबस्तात जमिनी ताब्यात घेण्याची प्रकिया सुरू केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. या आंदोलनाची माहिती मिळताच पालकमंत्री जयकुमार रावल यांनी पोलिसांना आणि महसूल अधिकाऱ्यांना कार्यवाहीला तात्पुरती स्थगिती देण्याचे आदेश दिले.

<><><><><>

१२वीच्या परीक्षेत सामूहिक कॉपी प्रकरणी बीड जिल्ह्यात १७ शिक्षकांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. चौसाळा इथं परवा १२वीच्या परीक्षेच्या पहिल्याच दिवशी ड्रोनवरुन गस्त घालणाऱ्या कॅमेऱ्यांनी हे शिक्षक कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करत असल्याची दृष्यं टिपली होती. छत्रपती संभाजीनगरमधे सामूहिक कॉपी प्रकरणी पर्यवेक्षकासह २३ जणांवर काल एफ आयआर दाखल करण्यात आला तर जालना जिल्ह्यात ६ शिक्षकांना निलंबित करण्यात आलं.

<><><><><>

पशुसंवर्धन विभाग आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्ह्यात परळी इथं महा पशुधन एक्स्पो २०२६ चं आयोजन करण्यात आलं आहे. १३ फेब्रुवारीला पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते या

प्रदर्शनाचं उद्घाटन होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस येत्या १४ फेब्रुवारीला प्रदर्शनाला भेट देऊन पशुपालकांशी संवाद साधणार आहेत.

**<><><><>**

**ठाणे** जिल्हा नियोजन समितीने काल २०२६-२७ या वर्षासाठी १ हजार ७०० कोटींचा विकास आराखडा मंजूर केला. या निधीचा शंभर टक्के वापर करावा असे निर्देश उपमुख्यमंत्री आणि ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. जिल्ह्याच्या सर्वसाधारण विकास आराखड्यासह इतर आराखड्यांचा शिंदे यांनी आढावा घेतला आणि नियोजित निधी मार्च २०२६ पर्यंत खर्च करण्याचे निर्देश दिले.

**लातूर** जिल्ह्यासाठीही ५११ कोटींचा विकास आराखडा मंजूर झाला. पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी या आराखड्याचा तसंच विकासकामांचा आढावा घेतला. निधीचा नियोजित वेळेत गुणवत्तापूर्ण विनियोग करावा असे निर्देश त्यांनी प्रशासकीय यंत्रणेला दिले.

**<><><><>**

टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना नामिबियाबरोबर दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर संध्याकाळी ७ वाजता होणार आहे. मुंबईच्या वानखेडे मैदानावर नेपाळ विरुद्ध इटली असा सामना सुरू आहे. इटलीनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

श्रीलंकेत कोलंबो इथं झालेल्या सामन्यात श्रीलंकेनं ओमानवर १०५ धावांनी विजय मिळवला. ओमाननं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचं ठरवलं. फलंदाजीसाठी उतरलेल्या श्रीलंकेनं २० षटकात ५ गडी गमावून श्रीलंकेनं २२५ धावा केल्या. मात्र ओमानला २० षटकात ९ बाद १२० धावाच करता आल्या.

**<><><><>**

दूरदर्शनच्या माजी वृत्तनिवेदिका सरला माहेश्वरी यांचं आज निधन झालं. त्या 7० वर्षांच्या होत्या. त्यांच्या निकटवर्तीयांनी समाजमाध्यमांवर ही माहिती दिली.

गेल्या काही काळापासून त्या आजारी होत्या. त्यांनी दूरदर्शनवर अनेक दशकं वृत्तनिवेदन केलं. जेव्हा खासगी वृत्तवाहिन्यांचं अस्तित्व नव्हतं अशा काळात त्यांनी आपल्या स्पष्ट शब्दफेकीनं आणि संयत सादरीकरणानं प्रेक्षकांच्या मनात घर केलं होतं.

//<><><><><>//